अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १३७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ ।


# 'इन्स्टा' शायरी OPEN 'डबल' मर्डर CLOSE




# पंढरपुरातील दुहेरी हत्याकांडाचा उलगडा

# विशाल शिंदे-नाईकच्या हातात बेड्या

✔ सोलापूर/प्रतिनिधी

लखन संजय जगताप (२५) आणि त्याची आई सुरेखा (वय ५५) यांच्या दुहेरी हत्याकांडचा तपास सहा महिने लागत नसल्यानं पंढरपूर पोलिसांची मती गुंग झाली होती. मारेकरी सापडत नसल्यांनं दबाव वाढला होता. त्यांच्याकडून होणाऱ्या तपासावरदेखील संशयाचे मळभ आले होते. तपासाचे सगळे फंडे यादरम्यान तपास अधिकाऱ्यांनी वापरले होते. मात्र हाती ठोस काहीच लागत नव्हतं. मात्र हत्याकांडाच्या मुळापर्यंत जाण्याचा जिगरबाज बाणा पोलिसांनी सोडला नव्हता. आरोपीबाबत संशय आल्यानंतर पोलिसांनी त्यावर बारीक नजर ठेवली होती. याच टप्प्यावर संशयित आरोपी मास्टरमाईंड विशाल शिंदे-नाईक यांनं 'इन्टाग्राम'वर 'सच्चाई छुपाई गई है, अफवाह उडाई गई, कहाणी कुछ और थी, सुनाई कुछ और गई..' ही शायरी पोस्ट केली. तिथंच त्याचा 'करेक्ट' कार्यक्रम होण्याचं पाऊल पडलं. संशय बळावलेल्या पोलिसांनी तपास अधिक कसून सुरु ठेवला. शेवटी दोनदा सुटलेला विशाल शिंदे आणि त्याचा भाऊ अथर्व हे शेवटी पोलिसांच्या जाळ्यात सापडले अन् दुहेरी हत्याकांडाचा मॅटर 'क्लोज' झाला.

ठोस पुरावं हाती लागत नसल्यानं दोन वेळा चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या डॉन विशाल शिंदेला पोलिसांनी सोडून दिलं होतं. मात्र सोशल मीडियाच्या 'इन्स्टा'वर त्यानं जी शायरी शेअर केली, त्या शायरीचा संबंध हत्याकांडाशी लागत असल्याचा पक्की खात्री पोलिसांना पटली आणि पुढं आत्मविश्वासच्या जोरावर त्यांनी संशयित शिंदेला उचललं.

पंढरपुरात १५ जुलै २०२५ रोजी लखन संजय जगताप आणि त्याची आई सुरेखा यांच्यावर विशाल शिंदे यांनी वार करत दोघांची निघृण हत्या केली होती. विशेष करुन हत्येच्या घटनेची माहिती पंढरपूर पोलिसांना विशाल शिंदे यानेच सर्वप्रथम दिली होती. मारेकरी विशाल यास मृत सुरेखांनी ओळखल्यामुळे विशालनं त्यांच्या चेहऱ्यावर अत्यंत कुरपणे वार केले होते. टोकाच्या वाद आणि अनैतिक संबंधांची किनार यामुळं १० मिनिटात विशाल यांनं निर्घण हत्या करुन माय लेकराचा कायमचा काटा काढला होता. खुनासाठी विशालने घरातील गवत कापायच्या मशीनचे पाते काढून त्याने हत्यार तयार केले होते. जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहपोलिस अधीक्षक डॉ. प्रशांत डगळे यांनी तपासाची सूत्रे १६ जानेवारी२०२६ रोजी हातात घेतली.

पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, सहायक पोलीस निरीक्षक शरद कदम व पोलीस कर्मचारी सुरज हेंबाडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने तपास सुरु केला.

### तब्बल २०० जणांची चौकशी केली

## अन् दुहेरी हत्याकांडाचे सापडले धागेदोरे

मर्डर झालेल्या परिसरातील मोबाईल टॉवरच्या रेंजमध्ये असणाऱ्या १२०० लोकांचे लोकेशन तपासून त्यांची चौकशी केली. त्याचबरोबर सीसीटीव्हीचे चित्रीकरण पाहून देखील ३०० च्या आसपास लोकांना पोलिस ठाण्यात बोलवून चौकशी केली होती. यातून पोलीस निरीक्षक कदम व पोलीस कर्मचारी सुरज हेंबाडे यांनी वरील लोकांचे नंबर फिल्टर करून २०० जणांची तपासणी सुरू केली. त्यानंतर त्यांना धागेदोरे हाती लागले.

### तपास भरकटवण्यासाठी विशालची चुतराई; पण हुश्शार पोलिसांनी भांडाफोड केलाच

या हत्येचा तपास चुकीच्या दिशेने जावा, भरकटला जावा, यासाठी घरातील टीव्ही व अन्य साहित्य नेऊन नदीपात्राजवळ टाकण्यात आले होते. त्याचबरोबर विशाल शिंदे-नाईक यानेच ११२ ला फोन करून घटना कळवलं होतं.



सुरेखा जगताप



लखन जगताप


### अथर्व शिंदेला घटनेपूर्वी मोबाईल कॉल,

## गुप्तचर सोडला अन् ठोस धागादोरा सापडला...

संशयित आरोपी विशाल शिंदे-नाईक याचा हत्येच्या वेळी तासभर फोन बंद होता. तथापि, गुन्हा घडण्याच्या पूर्वी संशियत विशाल शिंदे याचा अर्थव शिंदे-नाईक याला ११ सेकंदाचा मोबाईल कॉल झाला होता. याचा धागादोरा पकडून पोलिसांनी कसून तपास सुरू केला. त्या दोघांना मदत करणाऱ्या विधी संघर्ष बालकाकडून माहिती घेण्यासाठी पोलिसांनी सापळा रचून गुप्तचर सोडला. त्या गुप्तचर व्यक्तीला पोलिसांनी बक्षीस देण्याचे आमिष देऊन त्या विधीसंघर्ष बालकाजवळ पाठवले. त्या बालकाला खुश करून त्यांच्याकडून माहिती जाणून घेतली. त्याने घटनेबाबत माहिती सांगताच, त्या आधारे ताब्यात घेऊन चौकशी केली.

## चौकशीसाठी आठ पथकं

## घटना परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, लोकेशनचा वापर




या भयावह घटनेच्या तपासासाठी सोलापूर, पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका आदी ठाण्याचे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची आठ पथके कार्यरत केली होती. पंढरपूर शहरातील सीसीटीव्हीतील चित्रीकरण पाहून संशयितांना पोलिस ठाण्यात बोलवण्यात येत होते. त्याचबरोबर त्या परिसरात त्या दिवशी असलेल्या मोबाईल टॉवरच्या नजीकच्या लोकेशन नुसार संबंधित व्यक्तींना देखील पोलिस ठाण्यात बोलवून त्यांची चौकशी केली जात होती.

### दोघांचे हत्याकांड अन् शायरीचं कनेक्शन

## पंढरपूर पोलीस पोहोचले घटनेच्या मुळाशी...

संशयित आरोपी विशाल शिंदे-नाईक याने सोशल मीडिया चार खाती खोलली होती. त्यापैकी काही हाईड केली होती. मात्र एका फेक खात्यावरुन त्याने सुचकरित्या एक शायरी पोस्ट केली होती. संशयित विशाल याच्या कृत्यांवर बारीक लक्ष ठेवून राहणाऱ्या पोलिसांना दुहेरी हत्याकांड आणि शायरीच्या शब्दांचा अर्थ याचं कनेक्शन जुळतंय अशी खात्री पटली त्यावर पोलिसांनी पुढं तपासाची गती वाढवली. अखेर घटनेच्या मुळाशी ते पोचले.

### अथर्व राजस्थान होता, पोलिस पोचले अन् त्याच्या पायाखालची जमीन सरकली...


गुन्हा घडल्याच्या दोन महिन्यांनंतर अर्थव शिंदे-नाईक हा राजस्थान येथे जोधपूर येथे बहिणीकडे गेला. त्याठिकाणी तो सोन्याच्या दुकानात काम करत होता. अथर्व याला ताब्यात घेण्यासाठी पोलीस जोधपुरात अथर्वजवळ पोचले तेव्हा त्याच्या पायाखालची जमीन सरकली.

### बनवाबनवीच्या विशालनं खोटे साक्षीदार केले उभे; पोलिसांचा सुरुवातीला झाला नाईलाज

दुहेरी हत्याकांडांनर विशाल शिंदे-नाईक व अर्थव शिंदे-नाईक या दोघांना दोनवेळा चौकशीसाठी बोलावले. परंतु त्यांनी खोटे साक्षीदार उभे केले होते. त्यामुळे पुराव्याअभावी पोलिसांनी त्यांना सोडून दिले होते.

---

# Mission विधान परिषद



# पुन्हा 'कमळ' फुलविण्याची मोर्चेबांधणी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषदा, नगरपंचायत, सोलापूर महापालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत मोठं यश प्राप्त केलेल्या भाजपची नजर आता विधानपरिषदेच्या निवडणुकीवर गेली आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकीमधील मतदानासाठी ३५० चा मॅजिक फिगर भाजपकडं असल्यानं या पक्षाचा एक आमदार होऊ शकतो, हे स्पष्ट झाल्यावर विधानपरिषदेच्या निवडणुकीत 'कमळ' फुलवण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. त्याशिवाय या निवडणुकीसाठी भाजपचा उमेदवार म्हणून माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, माजी आमदार राजेंद्र राऊत, दिलीप माने, राजन पाटील, प्रशांत परिचारक, राम सातपुते या प्रबळ दावेदारांची नावे पुढं येत आहेत.

तथापि, विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी कोणता सक्षम चेहरा द्यायचा? याच्या चाचपणीचा गृहपाठ सुरु झाला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नजरेमधील योग्य चेहरा कोणता? याबद्दल औत्सुक्य आता मुख्य भाजपसह अन्य महत्वाच्या पक्षांमध्येदेखील असणार आहे.

विशेष करुन विधानपरिषदेची आमदारकी घेण्यासाठी जे प्रबळ दावेदार असल्याचं सांगण्यात येतं त्यांच्यामध्ये आता मी कसा श्रेष्ठ उमेदवार आहे? हे दाखवण्यासाठी स्पर्धा लागणार आहे. त्याशिवाय उमेदवारी पदरात पाडून घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडं इच्छुकांकडून मोठं लॉबिंग होऊ शकतं.

दरम्यान भाजप उमेदवारी म्हणजेच आमदारकीचा फिक्स गुलाल अंगावर घेणं असं समीकरण झालं आहे. कारण विधान परिषदेच्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी भाजपकडं ३५० मतांची मोठी वोट बँक आहे. त्यामुळं ज्याला उमेदवारी तो हमखास विनर असं चित्र उमटणार आहे. त्यामुळं उमेदवारीसाठी मोठी रेस होऊ शकते. उमेदवारी मिळण्यात कोणाचं नशिब फळाला येणार, याचं उत्तर येणाऱ्या काळाकडं असणार आहे. साधारण एप्रिलमध्ये विधान परिषदेची निवडणूक लागू शकते.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, जी नावे चर्चेत पुढे आली आहेत, त्यांच्यासंदर्भातील माहिती पक्षाकडून संकलित केली जाणार आहे. पक्ष निष्ठा, पक्षासाठीचं आजवरचं योगदान, संबंधित इच्छुक उमेदवाराच्या नेतृत्वाचा भविष्यात पक्षाला होणार फायदा? यापूर्वी संधी देताना कोणत्या इच्छुकावर अन्याय झाला, सध्याचं त्याच्या नेतृत्वाचं मेरिट काय? पक्षासाठी भरीव काम काय? या अनुषंगाने, चर्चेमधील नावांची माहिती श्रेष्ठींसमोर जाणार आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या सध्याच्या स्टेजला प्रबळ दावेदारांची जी नावे आहेत, त्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि पक्षासाठी भरीव योगदान देणाऱ्या माजी आमदार राजेंद्र राऊत आणि भाजपचे नेते शहाजी पवार या दोघांची नावे विधान परिषद उमेदवारीसाठी सर्वात पुढे राहतील असे भाजपच्या पक्षाच्या वरिष्ठ सुत्रांकडून सांगण्यात आलं. जे प्रबळ दावेदार आहेत, त्यांची 'ए टू झेड' माहिती घेण्यात येत आहे, असेही सुत्र म्हणाले.

भाजप उमेदवाराची लॉटरी नेमकी कोणाला मिळणार? याबद्दल आत्तपासून तर्क आणि अंदाज व्यक्त केले जाऊ लागले आहेत. उमेदवारीच्या मुद्यावर प्लस आणि मायनस याचा तराजू होऊ लागला आहे. त्या पार्श्वभूमीवर, इच्छुक नेतेमंडळींचा ७/१२ मांडला जाऊ लागला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हेच माझं पहिलं प्रेम !


कल्याण
260-88-378

मुंबई
134-80-677


## सोलापूर जिल्ह्यातील प्रबळ दावेदारांमध्ये कोण कोठे प्लस अन् कोण कोठे मायनस?

### भाजप नेते शहाजी पवार



मुख्यमंत्री फडणवीस यांचे सोलापूर जिल्ह्यातील अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय. स्वत:च्या मार्डी गावात भाजप रुजविण्यापासून ते पुढं पक्षाच्या प्रत्येक आघाडीवर भरीव योगदान. युवा मोर्चा पदाला न्याय. दोन टर्म जिल्हाध्यक्ष. जिल्हाध्यक्षपदाच्या कार्यकाळात खासदार आणि आमदार निवडून आणण्यात मोठं काम. उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर पंचायत समितीत भाजपची सत्ता आणण्यात यश. राम सातपुते यांच्या सोलापूर खासदारकीच्या निवडणुकीत दक्षिण सोलापूर तालुक्यातून भाजपचं होणारं मोठं नुकसान टाळण्याचं काम. जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडत असताना लगतच्या सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत रणनितीची कामगिरी. दक्षिण सोलापूर पंचायत समितीमधील सत्ता स्थापनेच्या ऐनवेळी शिवसेनाचा उमदेवार फोडून सत्ता आणून भाजपचं वजन वाढविण्याचा लक्षवेधी दाखवला चमत्कार. सोलापूर लोकसभेला खासदार आणि मोहोळ–उत्तर सोलापूर विधानसभेला आमदार निवडून आणण्यात अपयश. अनेक आघाड्यांवरील स्वत:ची मर्जी पक्षाला अडथळा ठरणारी.

### माजी आमदार राम सातपुते



भाजपमधील अनेक श्रेष्ठींसह मुख्यमंत्र्याचे निकटवर्तीय. चळवळीमधील आक्रमक कार्यकर्त्या म्हणून ओळख. माळशिरस तालुक्यात भाजप वाढवण्यात योगदान. अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीत पक्षाचे चार नगरसेवक निवडून आणत दहा हजार मतं भाजपच्या पाठिशी लावण्यात भरीव काम. पक्ष विस्तारासाठी अहोरात्र मेहनत. शासनाच्या आरोग्यासह अनेक योजनांचा लाभ मिळवून देऊन माळशिरस तालुक्यातील जनतेमध्ये भाजपचा 'करिष्मा' निर्माण करण्याचं काम. मात्र माढा लोकसभेला माळशिरस तालुक्यातून मताधिक्य देण्याच्या आघाडीवर मायनस. सोलापूर लोकसभा आणि माळशिस विधानसभा अशी दोन्ही निवडणुकीत पराभव. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत नेतृत्वाच्या फक्त स्वत:च्या पत्नीची एक जागा निवडून आणण्यात यश. पक्षाच्या विद्यमान आमदारांपेक्षा सर्व आघाड्यांवर मोठी ऊर्जा देऊनसुद्धा अपेक्षित रिल्झटं दाखवण्यात पिछाडी.

### माजी आमदार राजन पाटील



जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या मध्यस्तीनं मुख्यमंत्री फडवणीस यांच्याकडं वलय. भाजप पक्षासाठी मोठं नेतृत्व मोहोळ भागातून मिळाल्याची जाण. अनगर नगरपंचायत आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत मिळवून दिलेलं यश पक्षात अधोरेखीत होणारं. मात्र आमदारकी खासदारकीच्या निवडणुकीत नेतृत्वाची न उभी केलेली ताकद, आलेलं अपयश. तसेच अनगर अप्पर तहसील कार्यालयाचा मुद्दा ताणून मोहोळची नगरपरिषद भाजपच्या ताब्यात न येण्याला नेतृत्व कारणीभूत. भाजपला फायदा म्हणजे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत संमिश्र यश आणि अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटलांचा पराभव करण्यात दिलेलं योगदान. कारखाना, शैक्षणिक संस्था एकूणच सहकाराच्या आघाडीवर मिळत राहणार पक्षाची ऊर्जा.

### माजी आमदार राजेंद्र राऊत



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आणि निकटवर्तीय शिलेदार. भाजप किंबहुना फडणवीस यांना प्रत्येक आघाडीवर बार्शी तालुक्यातून नेतृत्वाची भरीव झलक दाखवण्यात यशस्वी. या तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, नगरपरिषद आणि जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत धवल कामगिरी. विरोधकास टक्कर देणारा धडाधडीचा चेहरा.

### माजी आमदार दिलीप माने



सहकार आणि राजकारणामधील धडक–बेधकड उजवा चेहरा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वजन. सोलापूर महापालिकेसह जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या उत्तर आणि दक्षिणमधील निवडणुकीत योगदान. भाजपला मोठं नेतृत्व मिळाल्याची सुखवणारी बाब. मात्र भाजप प्रवेश किंवा तद्वंतरच्या काळात स्व.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गुप्तपणे असलेला वावर. विधान परिषदेच्या उमेदवारीचा विषय झाल्यास भविष्यतील दक्षिण सोलापूर विधानसभा उमदेवारीच्या काय करणार? असा मुद्दा श्रेष्ठींकडून होणार. भाजपसाठी नवखा चेहरा.

### माजी आमदार प्रशांत परिचारक



सोलापूर जिल्ह्यात अडचणीच्या काळात भाजप रुजवण्यात योगदान. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हे ज्ञात. सोलापूर जिल्हा परिषदेत मागच्या वेळी आघाडी करुन सत्ता आणताना पक्षासाठी दिलेलं योगदान त्यापेक्षा मोर्चेबांधणी हे भरीव काम. पक्ष निष्ठांच्या अनुषंगाने, प्लस बाजू. मात्र माढा तसेच सोलापूर लोकसभेचे खासदार आणि आमदार निवडून आणण्यात आलेलं अपयश.